**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **विधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना वेळेची मर्यादा घालता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा.**
2. **५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून गोव्यात प्रारंभ.**
3. **बिहारचे मुख्यमंत्री म्हणून नीतीश कुमार यांनी १० व्यांदा घेतली शपथ.**
4. **गडचिरोलीमध्ये स्वतंत्र 'स्टील क्लस्टर' उभारण्यासाठीचा प्रस्ताव एआयडी द्वारा मुख्यमंत्र्यांकडे सादर.**

-------------------------------------------

सर्वोच्च न्यायालय

विधीमंडळानं मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपाल आणि राष्ट्रपतींना वेळेची मर्यादा घालता येणार नही असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या नेतृत्वाखालील ५ न्यायाधीशांच्या संविधान पीठाने आज हा निवाडा दिला. संविधानातल्या या पेचावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागितला होता. त्यावर संविधान पीठानं असं म्हटलंय की विधीमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकावर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यपालांना विलंब होत असेल तर सर्वोच्च न्यायालयाला त्या प्रकरणी हस्तक्षेप करुन विलंब टाळायला सांगता येईल. विधेयकातील तरतुदी मान्य नसल्यास राज्यपालांना ते विधानसभेकडे परत पाठवता येतं किंवा राष्ट्रपतींकडे मार्गदर्शनासाठी पाठवता येतं.

-------------------------------------------

इफ्फी

५६व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव-इफ्फीला आजपासून गोव्यात पणजी इथं सुरुवात होत आहे. यावर्षीच्या इफ्फीची सुरुवात एका विशेष पथसंचलनातून होणार असून, प्रेक्षकांचं स्वागत चित्ररथ, लोकगीतं आणि 'भारत एक सूर' या कार्यक्रमातून करण्यात येणार आहे. २८ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात ८१ देशातल्या २४० चित्रपटांचं प्रदर्शन होणार आहे. सुवर्णमयूर पारितोषिकासाठी १५

चित्रपटांना नामांकन  असून, यामध्ये गोंधळ या मराठी चित्रपटाचा समावेश आहे. या महोत्सवात ज्येष्ठ अभिनेते रजनीकांत यांचा ५० वर्षांच्या चित्रपट कारकिर्दीबद्दल विशेष सत्कार करण्यात येणार आहे. इफ्फीच्या निमित्ताने पणजीत भरलेल्या वेव्हज् फिल्म बाजारचं उद्घाटन आज माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यांच्या हस्ते झाल. या समारंभात दक्षिण कोरियाचे खासदार जेवोन किम यांनी केलेलं वंदे मातरम् चं गायन हे समारंभाचं मुख्य आकर्षण होतं.

-------------------------------------------

सुरक्षित भाडेतत्त्व म्हाडा

'महाराष्ट्र राज्याच्या शहरी विकासाच्या भविष्यासाठी सुरक्षित भाडेतत्त्वावरील घरे हा आता 'मुख्य प्रवाहातील पर्याय' म्हणून स्वीकार करण्याची वेळ आली आहे. 'म्हाडा'तर्फे तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य भाडेतत्त्वावरील घरांच्या धोरणाच्या प्रारूप मसुद्याची मांडणी परवडणारी, सर्वसमावेशक, पारदर्शक आणि सुलभता या चार मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे. बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीत तरुण पिढीला लवचिक, गतिशील आणि परवडणारे निवास उपाय उपलब्ध करणे अत्यावश्यक असल्याच प्रतिपादन ‘म्हाडा’चे  उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी काल केल. म्हाडातर्फे वांद्रे येथील सभागृहात आयोजित महाराष्ट्र राज्य भाडेतत्त्वावरील घरांच्या धोरणाच्या प्रारूप मसुद्याचे सादरीकरण आणि हितधारकांशी चर्चासत्र कार्यक्रमात संजीव जयस्वाल यांनी मसुद्याचे सादरीकरण केले.

-------------------------------------------

आल्हाद कलोती

अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती हे नगरसेवकपदाचे उमेदवार होते. आल्हाद कलोती यांच्या प्रभागातून रिंगणात असलेल्या काँग्रेसच्या उमेदवारासह नऊ उमेदवारांनी माघार घेतल्याने कलोती यांच्या अविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सर्व उमेदवारांनी माघार घेणे पसंत केले. हा दूरदृष्टीचा विजय आहे, अस युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी सांगितल.

-------------------------------------------

पक्षप्रवेश

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी आणि चांदुर बाजार परिसरातील शिवसेना उद्धव ठाकरे गटातील महत्त्वाचे कार्यकर्ते आणि शेकडो समर्थकांनी युवा स्वाभिमान पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे . वायएसपीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा स्वाभिमान पार्टीच्या राजापेठ येथील मुख्य कार्यालयात हा प्रवेश सोहळा पार पडला.

-------------------------------------------

मतदान जनजागृती

नगरपरिषद आणि नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुका २०२५ अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वाशीम जिल्ह्यात मतदान जनजागृतीवर मोठा भर देण्यात येत आहे. वाशिममध्ये आज भव्य मतदान जनजागृती रॅलीच आयोजन करण्यात आल. रॅलीतील 'आहोत आम्ही मतदार, मतदान हक्क अवश्य बजावणार', 'तुमचे मतदान तुमचा अधिकार', 'सुयोग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करा' अशा प्रभावी घोषणांनी देऊन जनजागृती करण्यात आली.

-------------------------------------------

'मन की बात'

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० नोव्हेंबर रोजी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२८ वा भाग असेल. या कार्यक्रमासाठी नागरीकांनी आपल्या सूचना आणि विचार १८००-११-७८०० या नि:शुल्क क्रमांकावर, मोदी ॲप किंवा माय जीओव्ही ओपन फोरमवर येत्या २८ तारखेपर्यंत पाठवण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. १९२२ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन एसएमएसच्या माध्यमातूनही पंतप्रधानांना आपले विचार पाठवता येतील.

-------------------------------------------

नीतिशकुमार शपथ

संयुक्त जनता दलाचे नेते नीतिशकुमार यांनी आज दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. पटना इथल्या प्रसिद्ध गांधी मैदानावर झालेल्या या सोहळ्यात राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. मंत्रिमंडळातल्या इतर सदस्यांनीही यावेळी शपथ घेतली, यात भाजपचे सम्राट चौधरी, विजय कुमार सिन्हा, मंगल पांडे, नितीन नवीन, रामकृपाल यादव यांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री, आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यावेळी उपस्थित होते.

-------------------------------------------

स्टील क्लस्टर’

एआयडी अर्थात असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटने गडचिरोलीमध्ये स्वतंत्र ‘स्टील क्लस्टर’ उभारण्यासाठीचा सविस्तर प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना औपचारिकरित्या सादर केला आहे. एआयडीचे अध्यक्ष आशिष काळे यांनी मुख्यमंत्र्यांची नागपूरमध्ये भेट घेऊन ‘गडचिरोली स्टील हब’ विकसित करण्यासंबंधी संकल्पना पत्र सादर केल. या पत्रात गडचिरोली स्टील हबला शाश्वत आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक असलेल्या उत्पादन आणि पूरक उद्योगांचे क्लस्टर म्हणून विकसित करण्याचा विचार मांडण्यात आला आहे. राज्यात उपलब्ध असलेल्या लोखंड धातूपासून स्थानिक पातळीवर मूल्यवर्धन, मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती, तसेच, संतुलित प्रादेशिक विकासाला चालना देण्यावर या प्रस्तावात विशेष भर देण्यात आला आहे. हा प्रस्ताव ॲडव्हान्टेज विदर्भ 2025 दरम्यान झालेल्या महत्त्वपूर्ण चर्चांवर आधारित आहे.

-------------------------------------------

ॲग्रोव्हिजन’

मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ‘ॲग्रोव्हिजन’ चे उद्घाटन उद्या, सकाळी 10.30 वाजता केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अमरावती रोडवरील मैदानावर होणार आहे. ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सहकारिता राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर, आदी उपस्थित राहणार आहे.

-------------------------------------------

केंद्रीय लोकसेवा आयोग

केंद्रीय लोकसेवा आयोग यांनी घेतलेल्या नागरी सेवा मुख्य परीक्षा-२०२५ चा निकाल ११ नोव्हेंबर २०२५ घोषित झाला आहे. मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (एसआयएसी) मुंबई येथे अभिरूप मुलाखत कार्यक्रम तसेच क्वालिटी एनरिचमेंट प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना या प्रशिक्षणाचा फायदा घेण्यासाठी २६ नोव्हेंबर २०२५ पूर्वी siac.cet2025@gmail.com या ईमेलवर अर्ज पाठवावे, असे आवाहन राज्य

प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. भावना पाटोळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

-------------------------------------------

जिजाऊ ब्रिगेड

महिलांचे सामाजिक, सांस्कृतिक विचारपीठ असलेल्या जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने तीन दिवसीय महाअधिवेशनाचे आयोजन चंद्रपुरात करण्यात आले आहे. 21 ते 23 नोव्हेंबरदरम्यान होणारे हे अधिवेशन प्रियदर्शिनी सभागृहात होणार आहे. या महाअधिवेशनाची सुरुवात उद्या दुपारी ४ वाजता जिजाऊ अभिवादन रैलीने होणार आहे. ही रॅली पवित्र दिक्षाभूमीला अभिवादन करून सुरू होईल.

-------------------------------------------

कुष्ठरोग मोहीम

चंद्रपूर शहरात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर पर्यंत कुष्ठरोग शोध मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेला सुरुवात करण्यात आली असुन २६ हजार १०१ घरांमध्ये ७१ चमूंद्वारे नवीन कुष्ठरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येणार आहे.

-------------------------------------------

बॅडमिंटन

सिडनी इथं सुरु असलेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन आणि एचएस प्रणॉय यांनी पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. तर किदाम्बी श्रीकांतनं चायनीज तैपेईच्या ली चिया-हाओचा पराभव करून अंतिम १६ मध्ये स्थान निश्चित केलं आहे.

-------------------------------------------

महार वतन

महार वतनाच्या मुद्द्यावर अद्यापही कुठलाही समाधानकारक तोडगा सरकारने काढलेला नाही. राज्यभरातील महार वतनासह रामोशी, देवस्थान, पाटील वतनाची जमीन मुळ वतनदारांना हस्तांतरित करण्यासाठी आणि या अनुषंगाने अभ्यासासाठी सरकारने उच्चस्तरीय अभ्यास समिती स्थापन करावी, अशी मागणी बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव,पश्चिम महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ.हुलगेश चलवादी यांन केली आहे. विशेष कायदा करून मुळ मालकांना या जमिनी हस्तांतरित केल्या; तरच त्या सुरक्षित राहतील, अस मत डॉ.चलवादींनी व्यक्त केलं.

-------------------------------------------

हवामान

विदर्भात आज सर्वात कमी तापमान भंडारा जिल्ह्यात दहा पूर्णांक दहा अंश सेल्सिअस इतक नोंदविण्यात आल. त्यानंतर गोंदिया, वाशिम आणि यवतमाळ इथं 11 अंश सेलसियसं तर नागपूर, गडचिरोली, अकोला आणि अमरावती इथं 12 अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, कमाल तापमानात वाढ होत असून सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं ३० पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं.

--------------------------------------------